महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645

मासं/रवका/न.क्र.०९/ २३४८३
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmhrmsedcl@gmail.com
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्र. ०२२ - ६९४२५१
**दिनांक: १८.०७.२०२५**

# परिपत्रक

**विषय: विद्युत सहाय्यक/ तंत्रज्ञ यांच्या विनंती बदली बाबत.**

........

महावितरण कंपनीमध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांच्या सेवांचा पर्याप्त व सुयोग्य वापर व्हावा या दृष्टीकोनातून प्रशासकीय परिपत्रक क्र.६९२ दि.०९.०४.२०२५ अन्वये एकत्रित मार्गदर्शक तत्वे/सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. याच धोरणा अंतर्गत विनंती बदली मिळण्यासाठी एम्प्लॉई पोर्टल या संगणक प्रणाली मधून विनंती अर्ज सादर करण्याबाबतची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच विनंती बदली अर्ज सादर करतांना अनुसरावयाच्या कार्यपध्दती बाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना पारित करण्यात आलेल्या आहेत. या अनुषंगाने सन २०२५ या वर्षाकरिता सर्वसाधारण बदली धोरण मर्यादित कालावधीसाठी राबविण्यात आले असून बदल्यांबाबतची कार्यवाही पूर्ण करण्यात आलेली आहे.

२. तांत्रिक संवर्गातील 'तंत्रज्ञ' हे पद सरळसेवेने विद्युत सहाय्यक म्हणून तीन वर्षाच्या कंत्राटी कालावधीसाठी भरण्याबाबत चालू असलेली कार्यवाही विचारात घेऊन वेतनगट चार मधील सद्या कार्यरत फक्त **'विद्युत सहाय्यक'** व **'तंत्रज्ञ'** या पदांवर कार्यरत कर्मचाऱ्यांचे विनंती बदली बाबतचे अर्ज **एक विशेष बाब** म्हणून विचारात घेण्याकरिता सक्षम अधिकारी यांनी मंजुरी प्रदान केलेली आहे.

३. या अनुषंगाने प्रशासकीय परिपत्रक क्र.६९२ दि.०९.०४.२०२५ मधील तरतुदींनुसार कंपनीत कार्यरत जे विद्युत सहाय्यक/ तंत्रज्ञ विनंती बदली मिळण्यास इच्छुक आहेत अशा कर्मचाऱ्यांनी त्यांचे विनंती बदलीबाबतचे अर्ज दि.२५.०७.२०२५ पूर्वी एम्प्लॉई पोर्टल या संगणकीय प्रणाली मधून ऑनलाईन पध्दतीने नव्याने सादर करावेत. तसेच कर्मचाऱ्याने एकदा सादर केलेला अर्ज रद्द किंवा सादर केलेल्या माहितीमध्ये बदल करता येणार नाही. विनंती बदली अर्ज सादर करतांना संबंधीत कर्मचाऱ्याने आवश्यक त्या सर्व कागदपत्रांच्या प्रती / प्रमाणपत्रे सादर करणे बंधनकारक आहे. तसेच बदलीवर्ष २०२५ करिता विनंती बदलीसाठी यापूर्वी सादर करण्यात आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

४. सदरची सुविधा एक विशेष बाब म्हणून विचारात घेण्यात येत असल्याने अर्जामधील माहिती सादर करतांना संबंधीत कर्मचाऱ्याने योग्य ती खबरदारी घेऊन माहिती अचूक असल्याची खातरजमा अर्ज अंतिमत: सादर करण्यापूर्वी (Submit) करावी. अर्जदाराने सादर केलेल्या माहितीच्या आधारे झालेली विनंती बदली कोणत्याही कारणास्तव रद्द होणार नाही यांची नोंद घ्यावी. तसेच संगणकीय प्रणाली व्यतिरीक्त लेखी स्वरूपातील विनंती अर्ज बदलीकरिता विचारात घेतले जाणार नाहीत. विनंती बदली बाबतची प्रक्रिया संगणकीय प्रणाली (Transfer Module) मार्फत करण्यात येईल. तसेच सर्व बदली आदेश हे केवळ SAP प्रणालीमधूनच निर्गमित करण्यात येतील.

५. सदर परिपत्रक कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

**(भूषण कुलकर्णी)**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**प्रत सविनय सादर:**

१) संचालक (वित्त)/(संचलन)/(मासं)/(प्रकल्प)/(वाणिज्य) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय छत्रपती संभाजीनगर/कल्याण.
३) कार्यकारी संचालक (वित्त व लेखा)/(वितरण)/(पायाभूत आराखडा/विशेष प्रकल्प)/(मासं)/(सुवअं) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
४) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/नागपूर.

**प्रत सस्नेह रवाना:**

१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/(सांघिक वित्त)/(अंतर्गत लेखा परिक्षण/(सांघिक लेखा)/(माहिती तंत्रज्ञान)/ मुख्य विधी सल्लागार/मुख्य तपास अधिकारी/ कंपनी सचिव, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या.,नाशिक.
३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई.
४) सर्व मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई. (सांघिक कार्यालय/क्षेत्रीय कार्यालय)

**प्रत रवाना:**

१) महाव्यवस्थापक (मासं)/(मासं-मासंव्यप्र)/(नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
३) मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्य अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.